Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
सत्याचे प्राईम्स
# जन सम्राट टाईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। मंगळवार, दि. १९ मे २०२६ । वर्ष १ । अंक ४४ । पाने २।
DIGITAL EDITION

नारपार–गिरणा योजना महाराष्ट्रासाठी वरदान!
(पान २ वर)



## २५ मेपासून उमेदवारी अर्ज दाखल • १ जून अर्जाची अंतिम मुदत • २ जूनला छाननी • २२ जूनला मतमोजणी

# महाराष्ट्रात पुन्हा निवडणुकांचे पडघम!

## १८ जूनला मतदान; स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारसंघांत रंगणार राजकीय लढत

जन सम्राट टाईम्स

**मुंबई । महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा निवडणुकांची रणधुमाळी सुरू होणार असून राज्यातील विधानपरिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील १६ जागांसाठी द्वैवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार १८ जून रोजी मतदान होणार असून २२ जून रोजी मतमोजणी होणार आहे.**

या निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया २५ मेपासून सुरू होणार असून अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख १ जून निश्चित करण्यात आली आहे. २ जून रोजी अर्जांची छाननी होणार असून त्यानंतर निवडणूक चित्र स्पष्ट होणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दीर्घकाळ रखडल्यामुळे या मतदारसंघांतील विधानपरिषदेच्या निवडणुकाही लांबल्या होत्या. मात्र अलीकडेच राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडल्याने या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला आहे. कोणत्या मतदारसंघांत होणार निवडणूक?



या निवडणुकीत राज्यातील १६ महत्त्वाच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांचा समावेश आहे. त्यामध्ये सोलापूर, अहिल्यानगर, ठाणे, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, यवतमाळ, पुणे, भंडारा-गोंदिया, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, नाशिक, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली, अमरावती, धाराशिव-लातूर-बीड, परभणी-हिंगोली तसेच छत्रपती संभाजीनगर-जालना या मतदारसंघांचा समावेश आहे. या निवडणुका स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्यांच्या मतदानावर आधारित असल्याने राजकीय पक्षांसाठी या निवडणुका प्रतिष्ठेच्या मानल्या जात आहेत. विशेषतः महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात थेट लढत होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वीच विधानसभेच्या सदस्यांच्या मतदानावर आधारित विधानपरिषदेच्या नऊ जागांसाठी निवडणूक पार पडली होती. या निवडणुकीत अनेक सदस्य बिनविरोध निवडून आले होते. गुरुवारी विधान भवनात पार पडलेल्या शपथविधी सोहळ्यात नव्याने निवडून आलेल्या सदस्यांनी पदाची शपथ घेतली. या सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### राजकीय समीकरणांना नवी दिशा

बिनविरोध निवड झालेल्या सदस्यांमध्ये भाजपचे प्रमोद जठार, माधवी नाईक, सुनील कर्जतकर, विवेक कोल्हे आणि संजय भेंडे यांचा समावेश आहे. या निवडणुका स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्यांच्या मतदानावर आधारित असल्याने राजकीय पक्षांसाठी या निवडणुका प्रतिष्ठेच्या मानल्या जात आहेत. तसेच शिवसेनेच्या नीलम गोऱ्हे, बच्चू कडू, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अंबादास दानवे तसेच राष्ट्रवादी काँग्रेसकडून झिशान सिद्दीकी यांची निवड झाली आहे. काँग्रेसच्या प्रज्ञा सातव यांनी राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या जागेसाठी झालेल्या पोटनिवडणुकीत त्यांनी भाजपमध्ये प्रवेश करून पुन्हा विजय मिळवला.या निवडणुकांमुळे राज्यातील राजकीय समीकरणांना नवी दिशा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या निवडणुकांकडे विशेष लक्ष लागले आहे.

---

» Selected

## मराठी न आल्यास रिक्षा, टॅक्सीचालकांना दंड

**मुंबई:** रिक्षा व टॅक्सीचालकांच्या मराठी सक्तीवर परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी पुन्हा एकदा ठाम भूमिका घेतली आहे. शाहरूख किंवा सलमान खानने आमच्याकडून रिक्षा-टॅक्सीसाठी चालक परवाना घेतलेला नाही तसेच अंबानी – अदानींनीही प्रवासी वाहतुकीचा परवाना घेतला नाही. त्यामुळे महाराष्ट्रात व्यवसाय करायचा असेल, तर येथील भाषा शिकावीच लागेल, असे स्पष्ट करताना मराठी न आल्यास १५ ऑगस्टपासून आधी दंड आकरण्यात येईल, मग कारवाई करण्यात येईल, असे प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले. रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठीची सक्ती केल्याने त्यांच्या रोजगारावर गदा येणार नाही. हा मूळ संवादाचा प्रश्न आहे. ग्रामीण भागातून मुंबईत येणाऱ्या अनेक प्रवाशांना हिंदी समजत नाही किंवा त्यांना बोलता येत नाही. त्यामुळे चालक व प्रवाशांत खटके उडतात.

---


जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

## २६ मे रोजी मान्सून दाखल होण्याची शक्यता

### उकाड्याने हैराण नागरिकांना दिलासा

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी:** प्रचंड उकाडा आणि वाढत्या तापमानामुळे हैराण झालेल्या नागरिकांसाठी भारतीय हवामान विभागाने (IMD) दिलासादायक अंदाज वर्तवला आहे. यंदा नैऋत्य मान्सून वेळेआधीच केरळ किनारपट्टीवर दाखल होण्याची शक्यता असून, २६ मे रोजी मान्सून केरळात पोहोचेल, असा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. त्यामुळे शेतकरी, नागरिक आणि प्रशासनामध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार, पुढील ४८ तासांत दक्षिण अंदमान समुद्र, बंगालचा उपसागर आणि अंदमान-निकोबार बेटांमध्ये मान्सूनच्या आगमनासाठी पोषक वातावरण तयार होत आहे. १६ मेच्या आसपास मान्सून अंदमान परिसरात सक्रिय होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यानंतर मान्सूनचा प्रवास वेगाने पुढे सरकत २६ मेपर्यंत केरळ किनारपट्टीवर पोहोचेल, असा अंदाज आहे. हवामान विभागाने दक्षिण भारतातील अनेक राज्यांसाठी मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. केरळ, तामिळनाडू, पुद्दुचेरी, माहे आणि दक्षिण कर्नाटकात पुढील चार ते पाच दिवस जोरदार



पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्याचबरोबर ईशान्य भारतात १३ ते १९ मेदरम्यान मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. काही भागांत ताशी ५० ते १०० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली असून नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### मान्सून आगमनासाठी पोषक वातावरण

पुढील ४८ तासांत दक्षिण अंदमान समुद्र, बंगालचा उपसागर आणि अंदमान-निकोबार बेटांमध्ये मान्सूनच्या आगमनासाठी पोषक वातावरण तयार होत आहे. १६ मेच्या आसपास मान्सून अंदमान परिसरात सक्रिय होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यानंतर मान्सूनचा प्रवास वेगाने पुढे सरकत २६ मेपर्यंत केरळ किनारपट्टीवर पोहोचेल.

---

## 'शिवसंवाद दौऱ्या'तून शिवसेनेची संघटनात्मक ताकद वाढविण्याचा निर्धार

जन सम्राट टाईम्स

**नाशिक | प्रतिनिधी:** १८ मे २०२६ राज्यभर सुरू असलेल्या 'शिवसंवाद दौऱ्या' अंतर्गत श्रीकांत शिंदे यांनी सोमवारी दिंडोरी आणि कळवण विधानसभा मतदारसंघातील शिवसेना पदाधिकारी, युवासेना, महिला आघाडी तसेच स्थानिक शिवसैनिकांसोबत सविस्तर आढावा बैठक घेतली. आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी या बैठकीत विविध विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. या बैठकीला शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. तसेच पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत, आमदार सुहास कांदे, आमदार मनिषा कायंदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. बैठकीदरम्यान बूथनिहाय नियोजन, मतदार संपर्क अभियान, गावपातळीवरील संघटन विस्तार तसेच ग्रामीण भागात शिवसेनेची ताकद अधिक प्रभावीपणे वाढविण्यासाठी



आवश्यक बाबींवर कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. नुकत्याच झालेल्या नगरपालिका आणि महानगरपालिका निवडणुकांमध्ये मिळालेल्या यशाच्या पार्श्वभूमीवर आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही मोठे यश संपादन करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.तसेच आगामी विशेष मतदार यादी पुनरिक्षण (SIR) मोहिमेच्या अनुषंगाने प्रत्येक बूथपर्यंत पोहोचून मतदारांची नावे तपासणे, नव्या मतदारांची नोंदणी करणे तसेच चुकीची किंवा बोगस नावे वगळण्यासाठी दक्ष राहण्याच्या सूचना देण्यात आल्या. युवासेना आणि महिला आघाडीने या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, कार्यकर्त्यांच्या अडचणी, सूचना आणि अपेक्षा जाणून घेत पुढील कामकाजासाठी आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. शिवसेनेची संघटनात्मक ताकद गावागावांत अधिक बळकट करण्यासाठी प्रत्येक पदाधिकाऱ्याने सक्रिय भूमिका बजावण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले. या बैठकीला नाशिकचे विलास शिंदे, भाऊसाहेब चौधरी, अजय बोरस्ते, विजय करंजकर, जिल्हाप्रमुख अनिल ढिकले, माजी खासदार आनंद परांजपे, उन्मेष पाटील तसेच युवासेनेचे उत्तर महाराष्ट्र संपर्क प्रमुख अविष्कार भुसे यांच्यासह स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शिवसेना संघटनात्मक स्तरावर सक्रिय

दरम्यान, 'शिवसंवाद दौरा' हा केवळ संघटनात्मक आढावा नसून कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधून पक्ष अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न असल्याची भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेना संघटनात्मक स्तरावर अधिक सक्रिय झाल्याचे या बैठकीतून स्पष्ट झाले.

---

## जळगावच्या जागेसाठी महायुतीत रस्सीखेच

### तीन टर्मपासून भाजपकडे असलेल्या विधान परिषद जागेवर शिंदेसेनेची जोरदार दावेदारी

जन सम्राट टाईम्स

**जळगाव |** विधान परिषदेच्या जळगाव स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीची घोषणा होताच महायुतीतील राजकीय हालचालींना वेग आला आहे. गेल्या तीन टर्मपासून भाजपच्या ताब्यात असलेल्या या प्रतिष्ठेच्या जागेवर आता शिवसेनेच्या शिंदे गटाने जोरदार दावा ठोकल्याने महायुतीत रस्सीखेच सुरू झाली आहे. त्यामुळे आगामी निवडणूक केवळ महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी न राहता भाजप विरुद्ध शिंदेसेना अशी अंतर्गत लढत होण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे. २०१६ मध्ये झालेल्या निवडणुकीत भाजपने ही जागा जिंकली होती. त्यानंतर डिसेंबर २०२२ मध्ये सदस्यांचा कार्यकाळ संपल्यानंतरही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्यामुळे विधान परिषद निवडणुकीलाही विलंब झाला होता. तब्बल तीन वर्षे चार महिन्यांच्या खंडानंतर अखेर १८ मे रोजी निवडणूक आयोगाने निवडणुकीची घोषणा केली आणि त्यानंतर राजकीय समीकरणांना नवे वळण मिळाले आहे.

जळगाव जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघांमध्ये शिवसेनेच्या शिंदे गटाने गेल्या काही काळात आपली ताकद मोठ्या प्रमाणात वाढवली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सदस्यसंख्या आणि मतदारसंघातील प्रभाव पाहता यावेळी शिवसेना मागे हटण्याच्या मनःस्थितीत नसल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. जिल्ह्यातील अनेक प्रमुख पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी या जागेवर दावा सांगण्यास सुरुवात केली असून पक्षश्रेष्ठींकडेही जोरदार लॉबिंग सुरू असल्याची माहिती समोर येत आहे.

दुसरीकडे, जळगाव हा भाजपचा पारंपरिक बालेकिल्ला मानला जात असल्याने भाजपदेखील ही जागा कोणत्याही परिस्थितीत सोडण्याच्या तयारीत नसल्याचे चित्र आहे. गेल्या तीन टर्मपासून पक्षाने या जागेवर सातत्याने विजय मिळवला असून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजपचे मजबूत जाळे असल्याचा दावा पक्षाकडून केला जात आहे. त्यामुळे ही जागा भाजपकडेच राहावी, अशी भूमिका पक्षातील वरिष्ठ नेते घेत आहेत.



### इच्छुकांची नावे चर्चेत

निवडणुकीची घोषणा होताच दोन्ही बाजूंनी उमेदवारांची नावे चर्चेत आली आहेत. यात भाजपकडून इच्छुकांमध्ये डॉ. केतकी पाटील, रोहित निकम, नंदू अडवाणी, नंदकिशोर महाजन आणि सुनील भंगाळे यांची नावे पक्षांतर्गत चर्चेत आहेत. तर शिवसेनेकडून (शिंदे गट) पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे पुत्र जिल्हा परिषदेचे माजी सदस्य प्रताप पाटील यांच्या नावाची चर्चा आहे. दरम्यान, या निवडणुकीच्या पा्श्वभूमीवर काही घडामोडी होण्याची शक्यता आहे.

---

## सीबीआय मोटेगावकरचा नीट क्लास घेणार!

### पेपरफुटी प्रकरणात सीबीआयची कारवाई

जन सम्राट टाईम्स

**लातूर | प्रतिनिधी :** NEET UG 2026 पेपरफुटी प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभागाने (CBI) आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई करत लातूर येथील प्रसिद्ध RCC कोचिंग क्लासेसचा संचालक शिवराज रघुनाथ मोटेगावकर याला अटक केली आहे. तपासादरम्यान मोटेगावकरच्या मोबाईलमध्ये फुटलेल्या प्रश्नपत्रिकांचे पुरावे आढळून आल्याने या प्रकरणाला मोठे वळण मिळाले आहे. सीबीआयच्या तपासानुसार, शिवराज मोटेगावकर हा नीट यूजी 2026 परीक्षा प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणातील सक्रिय सदस्य असल्याचे समोर आले आहे. इतर आरोपींसोबत संगनमत करून परीक्षेपूर्वी प्रश्नपत्रिका आणि उत्तरपत्रिका मिळवून ती विविध व्यक्तींना पुरवल्याचा आरोप त्याच्यावर ठेवण्यात आला आहे. १४ मे रोजी लातूरमधील शिवाजीनगर परिसरातील मोटेगावकरच्या निवासस्थानी CBIने छापा टाकला होता. यावेळी त्याचा मोबाईल जप्त करण्यात आला. फॉरेन्सिक तपासणीत मोबाईलमध्ये NEET UG 2026च्या फुटलेल्या प्रश्नपत्रिकांचे फोटो आणि संबंधित माहिती सापडल्याचा दावा तपास यंत्रणांनी केला आहे. तपासादरम्यान मोटेगावकरने विवेक पाटील आणि इतर काही व्यक्तींना फुटलेल्या प्रश्नपत्रिका तसेच उत्तरपत्रिकांच्या हस्तलिखित प्रती पुरवल्याचे उघड झाले आहे. मात्र या प्रश्नपत्रिका नेमक्या कोणकोणाला देण्यात आल्या, याबाबत तपास यंत्रणांनी अद्याप अधिकृत माहिती जाहीर केलेली नाही. सीबीआयच्या प्राथमिक तपासात राष्ट्रीय परीक्षा संस्था अर्थात एनटीए संबंधित काही सरकारी अधिकाऱ्यांशी आरोपींचे संगनमत असल्याचा संशयही व्यक्त



करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकरणात आणखी मोठे खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.तपासादरम्यान मोटेगावकरच्या मोबाईलमध्ये फुटलेल्या प्रश्नपत्रिकांचे पुरावे आढळून आल्याने या प्रकरणाला मोठे वळण मिळाले आहे. सीबीआयच्या तपासानुसार, शिवराज मोटेगावकर हा नीट यूजी 2026 परीक्षा प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणातील सक्रिय सदस्य असल्याचे समोर आले आहे.दरम्यान, परीक्षा झाल्यानंतर फुटलेल्या प्रश्नपत्रिका आणि संबंधित कागदपत्रे नष्ट करून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचाही आरोप मोटेगावकरवर ठेवण्यात आला आहे.

### विद्यार्थ्यांमध्ये संतापाचे वातावरण

या कारवाईनंतर राज्यभरातील स्पर्धा परीक्षा व्यवस्थेवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून विद्यार्थ्यांमध्ये संतापाचे वातावरण आहे. लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित असलेल्या परीक्षांमध्ये गैरप्रकार होत असल्याने कठोर कारवाईची मागणी आता अधिक तीव्र झाली आहे. दरम्यान, CBIकडून या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून आणखी काही आरोपींना ताब्यात घेतले जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. देशभरातील पेपरफुटी रॅकेटचा तपास आता अधिक व्यापक पातळीवर होण्याची चिन्हे दिसत आहेत.

---

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## "35 ते 40 तक्रारींनंतरही महापालिका झोपेत"

### ड्रेनेज सफाईअभावी दुर्गंधी, डासांचा प्रादुर्भाव; दुकानदारांचा प्रशासनावर निष्क्रियतेचा आरोप

जन सम्राट टाईम्स

**जळगाव :** जळगाव शहरातील व. वा. म्युनिसिपल मार्केट अर्थात गोलाणी मार्केट परिसरात घाण पाण्याच्या समस्येने गंभीर स्वरूप धारण केले असून, A विंगसह अनेक भागातील बेसमेंटमध्ये साचलेल्या सांडपाण्यामुळे व्यापारी आणि नागरिक हैराण झाले आहेत. ड्रेनेज आणि चेंबरची नियमित साफसफाई न झाल्याने ही परिस्थिती निर्माण झाली असल्याचा आरोप दुकानदारांनी केला आहे. विशेष म्हणजे, यासंदर्भात तब्बल ३५ ते ४० वेळा महापालिकेकडे तक्रारी करूनही कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आली नसल्याने व्यापाऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. दुकानदारांनी



महापौर Deepmala Kale यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, मार्केटच्या मागील बाजूस असलेले चेंबर आणि ड्रेनेज लाईनची अनेक वर्षांपासून योग्य प्रकारे साफसफाई करण्यात आलेली नाही. यामुळे सांडपाण्याचा निचरा होत नसून संडास आणि बाथरूममधील घाण पाणी थेट बेसमेंटमध्ये साचत आहे.

दुकानदारांच्या म्हणण्यानुसार, ड्रेनेज पाइपचा व्यास कमी असल्यामुळे ही समस्या अधिक गंभीर बनली आहे. बेसमेंटमध्ये सतत साचून राहणाऱ्या घाण पाण्यामुळे परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली असून डासांचा प्रादुर्भावही मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. परिणामी आरोग्याच्या समस्या निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे, बेसमेंटमध्ये घाण पाणी साचण्याची समस्या मागील तीन ते चार वर्षांपासून कायम असल्याचा गंभीर आरोप व्यापाऱ्यांनी केला आहे. या अस्वच्छतेमुळे ग्राहक मार्केट परिसर टाळत असल्याने व्यवसायावरही परिणाम होत आहे. काही दुकानदारांना तर बाथरूम बंद ठेवण्याची वेळ आल्याचे सांगण्यात आले आहे. तक्रारदारांनी महापालिका प्रशासनावर निष्क्रियतेचा आरोप करत महापौर दीपमाला काळे आणि संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे. "आरोग्याच्या दृष्टीने ही अत्यंत धोकादायक परिस्थिती असून भविष्यात कोणत्याही नागरिकाच्या जीवितास धोका निर्माण झाल्यास त्यास सर्वस्वी महापालिका जबाबदार राहील," असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.दरम्यान, या प्रकरणामुळे जळगांव महापालिकेच्या स्वच्छता आणि नागरी सुविधांच्या कार्यक्षमतेवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शहरातील नागरिक आणि व्यापाऱ्यांमध्ये प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

### व्यापारी आणि नागरिकांकडून जोरदार मागणी

महापौर दीपमाला काळे यांनी यापूर्वी शहरातील पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांची साफसफाई करत स्वतः टाकीत उतरून पाहणी केली होती. त्याच धर्तीवर त्यांनी गोलाणी मार्केट परिसरात प्रत्यक्ष भेट देऊन बेसमेंटमध्ये साचलेल्या घाण पाण्याचा निचरा करण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी, अशी जोरदार मागणी व्यापारी आणि नागरिकांकडून केली जात आहे.

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स



» Selected

## देशात पेट्रोल-डिझेल पुन्हा महागले!

मुंबई| प्रतिनिधी : सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री लागली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किंमतीत झालेल्या वाढीमुळे देशांतर्गत बाजारात पेट्रोल आणि डिझेलच्या दरांनी पुन्हा एकदा उचल खाल्ली आहे. मंगळवारी (१९ मे २०२६) देशभरात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात सरासरी ९० पैशांची वाढ करण्यात आली आहे. इंधनाच्या दरात चालू आठवड्यात झालेली ही दुसरी दरवाढ आहे. यापूर्वी गेल्या शुक्रवारीच पेट्रोल आणि डिझेलच्या दरात थेट ३ रुपयांची मोठी वाढ करण्यात आली होती. त्यानंतर आता अवघ्या काही दिवसांतच पुन्हा ९० पैशांची वाढ झाल्याने महागाईचा भडका उडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.महाराष्ट्राची राजधानी मुंबईत इंधनाचे दर नेहमीच इतर मेट्रो शहरांच्या तुलनेत चढे असतात. मंगळवारच्या दरवाढीनंतर मुंबईत पेट्रोल ९१ पैशांनी महागले असून, आता एक लीटर पेट्रोलसाठी मुंबईकरांना १०७.५९ रुपये मोजावे लागत आहेत.

# नारपार–गिरणा योजना उत्तर महाराष्ट्रासाठी वरदान!

## शेतकऱ्यांचा पाणीप्रश्न मार्गी लावला – पालकमंत्री गुलाबराव पाटील

जन सम्राट टाईम्स

जळगाव | प्रतिनिधी: उत्तर महाराष्ट्रातील दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या पाणीप्रश्नावर अखेर मोठा दिलासा मिळाला असून, बहुचर्चित नारपार–गिरणा नदीजोड योजनेला आता प्रत्यक्ष गती मिळू लागली आहे. जळगाव, नाशिक आणि धुळे जिल्ह्यांसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी ही योजना उत्तर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी खऱ्या अर्थाने जलसंजीवनी ठरणार असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री Gulabrao Patil यांनी केले.

पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितले की, २७ जून २०२३ रोजी जळगाव येथे आयोजित "शासन आपल्या दारी" कार्यक्रमात तत्कालीन मुख्यमंत्री तथा विद्यमान उपमुख्यमंत्री Eknath Shinde यांनी नारपार–गिरणा योजनेची ऐतिहासिक घोषणा केली होती. त्यानंतर महायुती सरकारने सातत्याने पाठपुरावा करत या प्रकल्पाला प्रशासकीय मंजुरी, आर्थिक मान्यता आणि आता प्रत्यक्ष कार्यारंभ आदेशापर्यंत आणले आहे. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यासाठी तब्बल ₹४,११६ कोटींच्या कामाचा कार्यारंभ आदेश जारी करण्यात आला असून, त्यामुळे उत्तर महाराष्ट्रातील दुष्काळी भागांना मोठा दिलासा मिळणार आहे.

विशेषतः जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव, पाचोरा, भडगाव, जामनेर आणि धरणगाव परिसरासह नाशिक जिल्ह्यातील मालेगाव, देवळा, सटाणा, कळवण तसेच धुळे जिल्ह्यातील अनेक भागांना या योजनेचा थेट लाभ होणार आहे. या योजनेमुळे शेतीसाठी मोठ्या प्रमाणावर सिंचनाचे पाणी उपलब्ध होणार असून, केळी, कांदा, द्राक्ष, मका



आणि कापूस यांसारख्या पिकांना स्थैर्य मिळणार आहे. त्याचबरोबर भूजल पातळी वाढणे, पिण्याच्या पाण्याची समस्या कमी होणे, ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळणे तसेच शेतकऱ्यांचे स्थलांतर रोखण्यास मदत होणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. याबाबत बोलताना पालकमंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, "नारपार–गिरणा योजना ही संपूर्ण महायुती सरकारच्या सामूहिक प्रयत्नांचे फलित आहे. मुख्यमंत्री Devendra Fadnavis यांनी या प्रकल्पाला प्रशासकीय आणि विकासात्मक गती दिली. दिवंगत उपमुख्यमंत्री Ajit Pawar यांनी आर्थिक नियोजन आणि मंजुरी प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावली होती. तर जलसंपदामंत्री Girish Mahajan यांनी सातत्याने या योजनेसाठी पाठपुरावा केला." त्यांनी पुढे सांगितले की, मंत्री दादा भुसे यांच्यासह जळगाव, नाशिक आणि धुळे जिल्ह्यातील सर्व मंत्री, आमदार, खासदार आणि लोकप्रतिनिधींनी एकमताने हा विषय शासनदरबारी लावून धरला. त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला उत्तर महाराष्ट्रातील पाणीप्रश्न आता मार्गी लागत आहे. पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांचे विशेष आभार मानले

### ग्रामीण विकासाचा नवा अध्याय ठरणार

महायुती सरकारने उत्तर महाराष्ट्राच्या विकासासाठी घेतलेला हा ऐतिहासिक निर्णय असल्याचे त्यांनी नमूद केले. दरम्यान, नारपार–गिरणा योजना ही केवळ नदीजोड योजना नसून उत्तर महाराष्ट्राच्या कृषी, उद्योग, पिण्याचे पाणी आणि ग्रामीण विकासाचा नवा अध्याय ठरणार असल्याची भावना शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

जन सम्राट टाईम्स | विशेष बातमी

## अवैध ट्रेडिंग कॉल सेंटर टोळीवर पोलिसांची कारवाई

जन सम्राट टाईम्स



धुळे | प्रतिनिधी: ऑनलाईन शेअर मार्केटमध्ये अधिक परताव्याचे आमिष दाखवून कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणाऱ्या अवैध कॉल सेंटर टोळीचा पर्दाफाश करण्यात धुळे सायबर पोलिसांना मोठे यश आले आहे. या प्रकरणात तब्बल ३ कोटी १४ लाख ९९ हजार ८९१ रुपयांची फसवणूक झाल्याचे समोर आले असून, पोलिसांनी आतापर्यंत चार आरोपींना अटक केली आहे.

Dhule Cyber Police Station येथे दाखल गुन्ह्यानुसार, फिर्यादी हर्षद नारायण देशपांडे (व्यवसाय – इंजिनिअर, रा. स्नेहनगर, धुळे) यांना ऑनलाईन शेअर मार्केट ट्रेडिंगद्वारे मोठा आर्थिक फायदा मिळवून देण्याचे आमिष दाखवण्यात आले होते.

आरोपींनी विविध मोबाईल नंबरवरून व्हॉट्सअॅप लिंक पाठवत त्यांना "848FYERS HNI VIP Growth Hub" या ग्रुपमध्ये सहभागी करून घेतले. यानंतर आरोपींनी फिर्यादीला FYERS INDIA (HNI) नावाचे अॅप डाउनलोड करण्यास सांगितले.

सुरुवातीला काही शेअर्समध्ये गुंतवणूक करून त्यांना चांगला परतावा देण्यात आला. त्यामुळे फिर्यादीचा विश्वास संपादन करण्यात आरोपी यशस्वी झाले. त्यानंतर अधिक नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत आरोपींनी फिर्यादीकडून वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये RTGS, NEFT आणि UPI च्या माध्यमातून एकूण ३.१४ कोटी रुपयांची ऑनलाईन रक्कम जमा करून घेतली. मात्र त्यानंतर कोणताही परतावा न देता त्यांची फसवणूक करण्यात आली. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३१९(२) तसेच माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६(ड) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

## देवपूरात रस्त्यावरील खड्ड्यात एसटी बस अडकली

### क्रेनच्या साह्याने बस बाहेर काढली




जन सम्राट टाईम्स

धुळे : धुळे शहरातील देवपूर परिसरात रस्त्याच्या मध्यभागी खोदण्यात आलेल्या मोठ्या खड्ड्यात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची बस अडकल्याची घटना सोमवारी घडली. या घटनेमुळे नवरंग पाण्याच्या टाकी परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. अखेर क्रेनच्या सहाय्याने बसला खड्ड्यातून बाहेर काढण्यात आले. मात्र या प्रकारामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून विकासकामांच्या दर्जाबाबत नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, धुळेहून शिरपूरकडे जाणारी एसटी बस देवपूर परिसरातून जात असताना विकासकामांसाठी खोदण्यात आलेल्या रस्त्यावरील खड्ड्यात तिचे चाक अडकले. अचानक बस एका बाजूला झुकल्याने प्रवाशांमध्ये घबराट पसरली. प्रसंगावधान राखत अनेक प्रवाशांनी तत्काळ बसमधून बाहेर पडत स्वतःचा जीव वाचवला. घटनेनंतर काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. रस्त्याच्या मध्यभागी बस अडकल्याने नवरंग पाण्याच्या टाकी परिसरात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. वाहतूक सुरळीत करण्यासाठी स्थानिक प्रशासन आणि पोलिसांना मोठी कसरत करावी लागली. दरम्यान, बस पूर्णपणे खड्ड्यात झुकल्यामुळे मोठा अपघात टळल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागला. यानंतर घटनास्थळी क्रेन मागवण्यात आली. सुमारे काही वेळ प्रयत्न केल्यानंतर अडकलेली बस क्रेनच्या सहाय्याने बाहेर काढण्यात आली आणि वाहतूक पुन्हा सुरळीत करण्यात आली. या घटनेनंतर शहरातील सुरू असलेल्या विकासकामांच्या दर्जावर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नागरिकांनी प्रशासनावर नाराजी व्यक्त करत, रस्ते खोदकामानंतर योग्य सुरक्षाव्यवस्था आणि दर्जेदार कामे केली जात नसल्याचा आरोप केला आहे. विशेषतः पावसाळ्यापूर्वी शहरातील रस्त्यांची अवस्था गंभीर बनत असल्याने भविष्यात मोठे अपघात होण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.

### धोकादायक रस्ते तातडीने दुरुस्त करा

स्थानिक नागरिकांनी संबंधित विभागाने या प्रकाराची चौकशी करून निष्काळजीपणा करणाऱ्या ठेकेदारांवर कारवाई करावी, तसेच शहरातील अपूर्ण आणि धोकादायक रस्ते तातडीने दुरुस्त करावेत, अशी मागणी केली आहे.

## वाळू लिलावाला ग्रामस्थांचा तीव्र विरोध

जन सम्राट टाईम्स



धुळे । प्रतिनिधी: न्याहळोद येथील पांजरा नदीपात्रातील प्रस्तावित वाळू लिलावाविरोधात बारा गावांतील ग्रामस्थ आक्रमक झाले असून, वाळू उपसामुळे भविष्यात गंभीर पाणीटंचाई निर्माण होण्याची भीती व्यक्त करत ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव घेतली. सरपंचांसह ग्रामस्थांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन तात्काळ वाळू लिलाव रद्द करण्याची मागणी केली. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी ग्रामस्थांच्या भावना लक्षात घेत वाळू लिलाव रद्द करण्याचे आश्वासन दिल्याची माहिती समोर आली आहे. = मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या अनेक वर्षांपासून न्याहळोद परिसरातील पांजरा नदीपात्रातून वाळू उपसाला प्रशासनाकडून परवानगी देण्यात आलेली नव्हती. मात्र यावर्षी स्थानिक ग्रामस्थांचा विरोध असतानाही प्रशासनाने वाळू उपसासाठी परवानगी दिल्याने परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, नदीपात्रातील मोठ्या प्रमाणावरील वाळू उपशामुळे भूजल पातळीवर गंभीर परिणाम होऊ शकतो. विशेषतः बारा गावांतील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर बनण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. पांजरा नदी परिसरातील जलसाठ्यावर या वाळू उपशाचा थेट परिणाम होणार असल्याने भविष्यात शेती आणि नागरिकांच्या दैनंदिन पाणीपुरवठ्यावर संकट ओढवू शकते, असा दावा ग्रामस्थांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर बारा गावांतील सरपंच, ग्रामस्थ आणि विविध पदाधिकाऱ्यांनी एकत्र येत जिल्हाधिकारी कार्यालयात धाव घेतली. त्यांनी प्रशासनाच्या निर्णयाविरोधात तीव्र संताप व्यक्त करत वाळू लिलाव तात्काळ रद्द करण्याची मागणी केली.

## बेरोजगारीविरोधात बहुजन मुक्ती पार्टीचे 'चुल्हा जलाओ

### २० मे रोजी जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयासमोर होणार आंदोलन

जन सम्राट टाईम्स






जळगाव प्रतिनिधी: वाढती महागाई, बेरोजगारी, इंधन दरवाढ, स्मार्ट मीटरच्या नावाखाली होणारी लूट तसेच लोडशेडिंगच्या विरोधात बहुजन मुक्ती पार्टीच्या वतीने २० मे २०२६ रोजी जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'चुल्हा जलाओ आंदोलन' करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन पक्षाच्या वतीने नागरिकांना करण्यात आले आहे. बहुजन मुक्ती पार्टीने देशभरात केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात तीन टप्प्यांत आंदोलन छेडले असून, त्याचा दुसरा टप्पा म्हणून हे आंदोलन होणार आहे. पक्षाच्या मते, गॅस, पेट्रोल, डिझेल आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किमती प्रचंड वाढल्यामुळे सर्वसामान्य जनतेचे जीवन कठीण झाले आहे. त्यातच स्मार्ट मीटरच्या माध्यमातून नागरिकांची आर्थिक लूट सुरू असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. पक्षाच्या निवेदनानुसार, राज्यात सध्या प्रचंड उष्णतेची लाट असताना ४५ अंश सेल्सिअस तापमानात लोडशेडिंगमुळे नागरिक आणि शेतकरी त्रस्त झाले आहेत. विजेअभावी ग्रामीण भागातील परिस्थिती गंभीर बनली असून सामान्य जनतेला मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. या सर्व परिस्थितीस केंद्र सरकार जबाबदार असल्याचा आरोप बहुजन मुक्ती पार्टीने केला आहे. या आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात १२ मे रोजी देशभरातील जिल्हाधिकाऱ्यांना कंदील भेट देऊन निवेदन सादर करण्यात आले होते. आता दुसऱ्या टप्प्यात २० मे रोजी सकाळी १० वाजता देशातील प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'चुल्हा जलाओ आंदोलन' करण्यात येणार आहे. जळगावमध्येही जिल्हाधिकारी कार्यालयासमोर हे आंदोलन पार पडणार आहे. बहुजन मुक्ती पार्टीचे जळगाव जिल्हाध्यक्ष राजेंद्र खरे आणि जिल्हा युवा अध्यक्ष सुनील देहाडे यांनी जळगाव जिल्ह्यातील नागरिकांना आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. पक्षाच्या वतीने सांगण्यात आले की, हे आंदोलन केवळ राजकीय नसून सर्वसामान्य नागरिकांच्या हक्कासाठी आणि वाढत्या आर्थिक संकटाविरोधात आवाज उठवण्यासाठी आयोजित करण्यात आले आहे. महागाईमुळे गृहिणी, कामगार, शेतकरी आणि बेरोजगार युवकांचे जगणे कठीण झाले असून शासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली आहे. दरम्यान, या आंदोलनाकडे जिल्ह्यातील नागरिकांचे लक्ष लागले असून विविध सामाजिक संघटना आणि कार्यकर्त्यांकडूनही या आंदोलनाला पाठिंबा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे

### सर्वसामान्य जनतेचे जीवन कठीण झाले

.बहुजन मुक्ती पार्टीने देशभरात केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात तीन टप्प्यांत आंदोलन छेडले असून, त्याचा दुसरा टप्पा म्हणून हे आंदोलन होणार आहे. पक्षाच्या मते, गॅस, पेट्रोल, डिझेल आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किमती प्रचंड वाढल्यामुळे सर्वसामान्य जनतेचे जीवन कठीण झाले आहे. त्यातच स्मार्ट मीटरच्या माध्यमातून नागरिकांची आर्थिक लूट सुरू असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. पक्षाच्या निवेदनानुसार, राज्यात सध्या प्रचंड उष्णतेची लाट असताना ४५ अंश सेल्सिअस तापमानात लोडशेडिंगमुळे नागरिक आणि शेतकरी त्रस्त झाले आहेत.

## रेल्वेस्टेशन अतिक्रमणधारकांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर विराट मोर्चा

### तपत्या उन्हात आंदोलन; प्रशासनासोबतच्या बैठकीत सकारात्मक तोडगा, आंदोलन तात्पुरते स्थगित

जन सम्राट टाईम्स

धुळे । प्रतिनिधी : धुळे शहरातील रेल्वे स्टेशन परिसरातील अतिक्रमण हटवण्याच्या मनपा प्रशासनाच्या कारवाईविरोधात अतिक्रमणधारकांसह आंबेडकरी समुदायाने सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर विराट मोर्चा काढला. तपत्या उन्हात निघालेल्या या मोर्चादरम्यान एक दुर्दैवी घटना घडली असून आंदोलनात सहभागी झालेल्या शिवाजी निंबा सोनवणे (वय ५०) यांचा मृत्यू झाला आहे. तर एका व्यक्तीसह दोन महिलांना भोवळ आल्याने त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. Dhule Municipal Corporation प्रशासनाने रेल्वे स्टेशन परिसरातील अतिक्रमण हटवण्यासाठी पंधरा दिवसांपूर्वी नोटिसा बजावल्या होत्या. या नोटिसांमुळे अतिक्रमणधारक आणि आंबेडकरी समाजामध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली होती. अतिक्रमण हटवण्यापूर्वी संबंधितांना पर्यायी जागेत पुनर्वसन करावे तसेच शहरातील सर्वच अतिक्रमणांवर समान कारवाई करावी, या प्रमुख मागण्यांसाठी हा मोर्चा आयोजित



करण्यात आला होता. रेल्वे स्टेशन परिसरातून निघालेला मोर्चा बसस्थानक मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. मोर्चात महिला, पुरुष, युवक तसेच लहान बालकांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती होती. आंदोलनकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला.

जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर आंदोलनकर्त्यांनी ठिय्या आंदोलन सुरू केले. दरम्यान, प्रचंड उष्म्यामुळे अनेक आंदोलनकर्त्यांची प्रकृती बिघडू लागली. आंदोलन संपवून घरी परतल्यानंतर शिवाजी निंबा सोनवणे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात आली. तसेच दोन महिलांसह एका व्यक्तीस भोवळ आल्याने त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेनंतर काही काळ जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणत आंदोलनकर्त्यांना शांत केले. त्यानंतर प्रशासन आणि आंदोलनकर्त्यांच्या प्रतिनिधींमध्ये बैठक पार पडली. सुमारे तीन ते साडेतीन तास चाललेल्या चर्चेनंतर प्रशासनाकडून सकारात्मक भूमिका घेण्यात आल्याची माहिती आंदोलनकर्त्यांनी दिली. पुनर्वसनासंदर्भात योग्य तो विचार केला जाईल तसेच संबंधित मागण्यांवर चर्चा सुरू ठेवण्याचे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आल्याने आंदोलनकर्त्यांनी आंदोलन तूर्तास स्थगित करण्याचा निर्णय घेतला. यावेळी आंदोलनकर्त्यांनी मृत्यू झालेल्या शिवाजी सोनवणे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज

## जळगाव बाजार समितीच्या सभापतिपदी भाजपचे लक्ष्मण पाटील बिनविरोध

### तीन वर्षांत दोनदा हुकलेली संधी अखेर तिसऱ्या प्रयत्नात साधली; 'लकी टेलर' ठरले यशस्वी

जन सम्राट टाईम्स

जळगाव | प्रतिनिधी : जळगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतिपदाच्या निवडणुकीत अखेर भाजपचे लक्ष्मण पाटील ऊर्फ 'लकी टेलर' यांची बिनविरोध निवड करण्यात आली. गेल्या तीन वर्षांत दोन वेळा हातातून निसटलेली संधी अखेर तिसऱ्या प्रयत्नात त्यांच्या पदरात पडल्याने भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. बाजार समितीतील या निवडीमागे पडद्यामागे मोठ्या राजकीय हालचाली झाल्याची चर्चा रंगली असून, मंत्री गिरीश महाजन यांनी सावध खेळी करत ऐनवेळी लक्ष्मण पाटील यांच्या नावावर शिक्कामोर्तब केल्याचे बोलले जात आहे. माजी सभापती सुनील महाजन यांच्या राजीनाम्यानंतर गेल्या नऊ दिवसांपासून बाजार समितीतील राजकीय वातावरण चांगलेच तापले होते. नव्या सभापतीपदासाठी अनेक इच्छुकांनी मोर्चेबांधणी सुरू केली होती. संचालकांच्या गाठीभेटी, चर्चा आणि राजकीय समीकरणे यामुळे निवडणुकीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले होते. भाजपमध्येही अंतर्गत चुरस वाढल्याने बंडखोरीची



शक्यता व्यक्त केली जात होती. अखेर राज्याचे मंत्री तथा भाजपचे जिल्ह्यातील संकटमोचक नेते गिरीश महाजन यांनी परिस्थिती हाताळत लक्ष्मण पाटील यांच्या नावावर अंतिम शिक्कामोर्तब केले. त्यानंतर इतर इच्छुकांनी माघार घेतल्याने लक्ष्मण पाटील यांची बिनविरोध निवड निश्चित झाली. लक्ष्मण पाटील यांचा सभापतीपदापर्यंतचा प्रवास संघर्षमय राहिला आहे. यापूर्वी १९ नोव्हेंबर २०१७ ते ९ मे २०१९ या कालावधीत त्यांनी सभापतीपद भूषवले होते. . पुढे काही काळ प्रभारी सभापती म्हणून वसंत भालेराव यांनी कामकाज पाहिले, तर त्यानंतर कैलास चौधरी यांच्याकडे सभापतीपदाची धुरा गेली. २० मे २०२३ रोजी पुन्हा एकदा लक्ष्मण पाटील यांच्या नावाची जोरदार चर्चा होती. मात्र ऐनवेळी राजकीय समीकरणे बदलली आणि श्यामकांत सोनवणे यांनी बाजी मारली. ही संधी हुकल्यानंतर लक्ष्मण पाटील यांनी तीव्र नाराजी व्यक्त केल्याचेही त्या काळात समोर आले होते. यंदाची निवड त्यांच्या राजकीय पुनरागमनाची मोठी संधी मानली जात आहे.

### विकासासाठी काम करण्याची ग्वाही

बाजार समितीच्या सभापतीपदाची निवडणूक बिनविरोध झाली असली तरी त्यामागील राजकीय घडामोडींनी जिल्हा भाजपमधील अंतर्गत गटबाजी पुन्हा एकदा चर्चेत आणली आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या निवडीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. दरम्यान, सभापतीपदी निवड झाल्यानंतर लक्ष्मण पाटील यांनी सर्व संचालकांचे आभार मानत बाजार समितीच्या विकासासाठी प्रामाणिकपणे काम करण्याची ग्वाही दिली.

## जळगाव महानगरपालिकेत 'सुपरफास्ट' फाइलचा चमत्कार!

जन सम्राट टाईम्स

जळगाव : जळगाव पालिकेच्या कारभारावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी धक्कादायक बाब समोर आली आहे. सामान्य नागरिकांच्या आणि विकासकामांच्या फाइल्स महिनोन्महिने धूळ खात पडलेल्या असताना, एका ठेकेदाराशी संबंधित तब्बल १२६ कोटी रुपयांच्या प्रस्तावाची फाइल अवघ्या चार तासांत चार मजले आणि चार वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या टेबलवरून फिरत थेट महासभेत मंजुरीसाठी पोहोचल्याने महापालिकेच्या कार्यपद्धतीवर संशय व्यक्त केला जात आहे. "१२६ कोटी आणि ठेकेदार" हेच या फाइलच्या वेगवान प्रवासामागील मुख्य इंधन असावे, अशी उपरोधिक प्रतिक्रिया आता नागरिक आणि राजकीय वर्तुळातून व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ख्वाजामियाँ झोपडपट्टीच्या जागेवर व्यावसायिक संकुल आणि वाहनतळ उभारण्यासंदर्भातील हा प्रस्ताव होता. त्यानंतर ११ डिसेंबर २०२५ रोजी अधिकृत निवाडा जाहीर करण्यात आला. विशेष म्हणजे, निवाडा झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी म्हणजे १२ डिसेंबर रोजी नव्याने प्रस्ताव तयार करण्यात आला आणि त्याच दिवशी संबंधित फाइलवर विविध विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या. अवघ्या काही तासांत ही फाइल मंजुरीसाठी महासभेत दाखल झाली आणि विषयाला हिरवा कंदील मिळाला.